**बातमीपत्र**

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १२ जून २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३६५/२०२३ भादवि ३२४,१४३,१४८,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०६/२०२३ रोजी १०.३० वा ते १४.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०६/२०२३ रोजी १९.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आकाश चंद्रकांत भोसले, वय- २५ वर्षे, रा. २७/५, निराळे वस्ती, सपाटे यांचे घराजवळ, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रभाकर जनार्दन भोसले, २) सौदागर शंकर बाबर, ३) वैशाली प्रभाकर भोसले, ४) राज प्रभाकर भोसले, ५) सोमनाथ ऊर्फ सोम्या ज्ञानेश्वर देशमुख, ६) आबा सौदागर बाबर, ७) भास्कर जनार्धन भोसले, ८) कालींदाबाई भास्कर भोसले, सर्व रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरासमोर चुलता तुळशीदास भासले यांचे भिंतीला कपडे वाळविण्यासाठी दोरी बांधत असताना चुलता यातील आरोपीत क्रं. १ व २ असे येवून तु दोरी बांधायची नाही मोटार सायकल रोडवर लावायची नाही असे म्हणून आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीचे गालावर चापट मारली व आरोपीत क्रं. २ याने शिवीगाळ दमदाटी करीत असताना आरोपीत क्रं. ३ ही येवून तिने फिर्यादीचे गालात चापट मारली त्यावेळी फिर्यादीची आई निलावती ही भांडण सोडविण्यासाठी आली असता आरोपीत क्रं. ४ याने तिस धक्काबुक्की केली. त्यानंतर फिर्यादी घरात गेले होते व नंतर फिर्यादी कामावर गेले असता आईन फिर्यादीस फोन करुन सागंगितले की आरेपीत क्रं. ५ याने तिस शिवीगाळ केली आहे. त्यामुळे फिर्यादीचे वडील हे आरोपीत क्रं. ५ यास शिवीगाळ का करतो असे विचारले असता, त्याने वडीलास बुलडोजर लावून घर पाडतो असे म्हणून वडीलांना चापट मारली. त्यावेळेस फिर्यादी भांडण सोडविण्यास गेले असता, आरोपीत क्रं. ६,७,८ यांनी येवून फिर्यादीस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व आरोपीत क्रं. ५ याने लोखंडी फायटरने फिर्यादीचे तोंडावर कपाळावर उजव्या डोळयावर मारहाण केली केली आहे म्हणून. तपासः- पोना/ ७३२ कामुर्ती - ८८०५०५१३०० |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३६६/२०२३ भादवि ३२४,३२७,१४३,१४७,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०६/२०२३ रोजी १०.३० वा ते १३.३० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०६/२०२३ रोजी २२.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रभाकर जनार्दन भोसले, वय- ५४ वर्षे, रा. २७/५, निराळे वस्ती, सपाटे यांचे घरासमोर, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) आकाश ऊर्फ बालाजी चंद्रकांत भोसले, २) जोतिर्लिंग जाधव, ३) निलाबाई चंद्रकांत भोसले, ४) चंद्रकांत भोसले, ५) माधुरी नागणे, ६) माधुरी नागणेचा पती, |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत क्रं. १ याने त्याची मोटार सायकल फिर्यादीचे घरासमोर नळाजवळ लावली त्यावेळी फिर्यादी त्यास येथे गाडी लावू नकोस असे म्हणाले असता आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीची शर्टाची गच्ची पकडुन डोक्यात हाताने मारण्यास सुरुवात केली. तसेच वरील आरोपीत क्रं. २ ते ६ यांनीही फिर्यादीस मारहाण केली त्यावेळी फिर्यादीची पत्नी भांडण सोडविण्यास आली असता तीस आरोपीत क्रं. ३ हिने केस ओढुन तिला मारहाण केली त्यावेळी फिर्यादीचा मुलगा राज हा आला असता त्यास आरोपीत क्रं. १ याने लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी हे घरात थांबले असता फिर्यादीचे पत्नीचे गळयातील सोन्याचे एक तोळयाचे मनिमंगळसुत्र आरोपीत क्रं. ३ हिने तोडुन घेतल्याचे दिसले. त्यानंतर फिर्यादीचा भाचा सोमनाथ हा आला व त्याने आरोपीत क्रं. ३ हिस का भांडण केले विचारले असता त्यास आरोपीत क्रं. १,४,५ यांनी फिर्यादीचे घरात येवून सोमनाथ याचे गच्चीला धरुन घराचे बाहेर ओढत नेवून मारण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादीचा भाऊ भास्कर हा भांडण सोडविण्यास आला असता आरोपीत क्रं. १ याने त्याचे डोकीस फरशी मारली त्यामुळे त्याचे डोकीस जखम झाली आहे. त्यावेळी फिर्यादीची पत्नी व मुलगा राज असे भांडण सोडविण्यास गेले असता आरोपीत क्रं. ४ याने दगड मारुन जखमी केले आहे व पत्नी वैशाली हिस आरोपीत क्रं. ३ हिने मारहाण करुन हाताला चावा घेतला व आरोपीत क्रं. १ याने डोक्यात फरशी मारली आहे म्हणून तपासः- सपोनि- गायकवाड- **९९७००३३८४०** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २३४/२०२३ भादवि २७९,३०४(अ), मोवाकाक १८४,१३४ (अ)(ब) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०६/२०२३ रोजी ११.०० वा चे सुमारास, सागर हॉटेल समोर, ७० फुट रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०६/२०२३ रोजी १४.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विरेश कलाप्पा गिडवीर, वय- ३२ वर्षे, रा. किसन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | क्रेन क्रं. एम एच १३ डी एम ५३८२ चा चालक नाव पत्ता माहित नाही |
| **मयताचे नाव** | : | विश्वनाथ धोंडिबा जाधव, वय- ६७ वर्षे, रा. ७० फुट रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे ओळखीचे विश्वनाथ धोंडिबा जाधव, वय- ६७ वर्षे, हे चालत रस्ता ओलांडुन घराकडे जात असताना ७० फुट रोड ते एम आय डी सी कडे जाणारे वरील आरोपीत वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील क्रेन हयगयीने, निष्काळजीपणाने, चालवुन विश्वनाथ जाधव यांना धडक देवून त्यात त्याचे डोक्याला गंभीर दुखापत करुन त्याचे मृत्युस कारणीभुत होवून क्रेन जागीच सोडुन पळुन गेला आहे म्हणून. तपासः- पोसई/ बादोले - **९८२३४९९५५६** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९१/२०२३ भादवि ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/०६/२०२३ रोजी २१.३० वा ते दि. ०४/०६/२०२३ रोजी १२.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०६/२०२३ रोजी २२.५७ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | **:** | भरत अमरदास जोगदीया, वय- ४४ वर्षे, रा. १००/२, सोनिया नगर, इप्पा कायल रो हाऊस, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | ६४,५००/- रुपये असे त्यात २.५ ग्रॅमचे सोन्याचे कानातील फुल, ४ ग्रॅमचे सोन्याचे कानातील त्रिकोणी फुल, ५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसुत्र, १० तोळे वजनाचे चांदीचे पायातील पैंजण, एक विवो कंपनीचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे देवकार्य करण्याकरीता कुटुंबियांसह गुजरात येथे गेले असता, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दरवाज्याचे कडी कोयंडा तोडुन, घरात प्रवेश करुन, कपाटातील नमुद वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने फिर्यादीचे संमतीवाचून चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ६२५ उबाळे - ९९६७४३७८२२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३३५/२०२३ भादवि ३२४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०९/०६/२०२३ रोजी १३.३० वा चे सुमारास, हत्तुर उड्डाण पुलाच्या थोडया अंतरावर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ११/०६/२०२३ रोजी १५.१३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | चंद्रकांत बिरप्पा बन्ने, वय- ६५ वर्षे, रा. मु.पो. मरगुर, ता. इंडी, जि. विजापुर, राज्य - कर्नाटक |
| **आरोपीचे नाव** | **:** | म्हाळप्पा सिध्दप्पा वड्डुरे, रा. इंडी, जि. विजापूर, राज्य- कर्नाटक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी यांनी यातील वरील आरोपीताविरुध्द फिर्यादीची नात हिस शाळेत जात असताना छेडल्यामुळे त्याचे विरुध्द तक्रार दिली होती. तरी वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे हत्तुर उड्डाण पुलाच्या थोडया अंतरावर फिर्यादी सोलापूर येत असताना एस टी बस पम्चर झाल्याने फिर्यादी पायी चालत येत असताना आरोपीत मजकुर हा फिर्यादीचे पाठीमागुन मोटार सायकलवरुन येवून फिर्यादीजवळ गाडी थांबवुन तु माझ्या विरुध्द विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केले असे म्हणून फिर्यादीस खाली ढकलुन सोबत आणलेल्या लाकडी दांडक्याने फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले आहे व कुऱ्हाडीने जिवे ठार मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२३ म्हेत्रे - ७०२०४९१४८९ |